शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

मराठी वाड.मय परिषद, बडोदे या संस्थेमार्फत बडोदे, गुजरात येथे दि.१६, १७ व १८ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीमध्ये ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असल्याबाबत मा.कार्याध्यक्ष, ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बडोदे यांनी दि.०६/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदरचे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविले आहे. त्यानुसार इच्छुक महाविद्यालयांनी सदर संमेलनाचा लाभ घ्यावा.

कळावे,

आदेशान्वये,

I/Cउपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.
संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ No. 156
दि.: 28 DEC 2017

॥ श्री ॥

मराठी वाङ्मय परिषद, बडोदे आयोजित

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

# ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन


श्रीमंत राजमाता शुभांगिनीराजे गायकवाड
स्वागताध्यक्ष

दिलीप खोपकर
कार्याध्यक्ष

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
अध्यक्ष
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

★

मराठी वाङ्मय परिषद, बडोदे.

दिलीप खोपकर
अध्यक्ष

डॉ. वनिता ठाकूर
आशिष जोशी
कार्यवाह

संदीप दहिवलकर
खजिनदार

★

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

सुधाकर भाले
उपाध्यक्ष

डॉ. इंद्रजित ओरके
कार्यवाह

डॉ. विलास चिंतामण देशपांडे
कोषाध्यक्ष


संचालक
बी.सी.यु.डी.
शिवाजी युनिव्हर्सिटी
विद्यानगर
कोल्हापूर - ४१६००४

बडोदे, ०६/१२/२०१७

T-2
२४९१० 21/12/2017

**विषय: आपल्या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ९१व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभाग। होण्याबाबत**

माननीय महोदय,
सादर प्रणाम.

"मराठी वाङ्मय परिषद, बडोदे." ही गेल्या ८६ वर्षांपासून मराठी संस्कृती, तिला व्यक्तरूप देणारी भाषा व त्या भाषेतील साहित्य यांचे जतन व संवर्धन करणारी गुजरातमधील - बडोद्यामधील संस्था.

आमच्या संस्थेतर्फे प्रतिवर्षी तीन दिवसांचे अधिवेशन (संमेलन), आयोजित करण्याबरोबरच विविध विषयांवरील व्याख्यानमाला, परिसंवाद, वृंदसंवाद, मार्गदर्शन शिबिर, कार्यशाळा, कविसंमेलन, कथाकथन, कथापूर्ती, विविध क्षेत्रांतील नामवंतांची मुलाखत, त्याशिवाय साहित्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, अनुवादाला प्रवृत्त करणारे कार्यक्रम, स्थानिक तसेच अखिल भारतीय साहित्य स्पर्धा, अभिरुचि गौरव पुरस्कार व साहित्य स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा, ग्रंथ-प्रकाशन असे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

संस्थेच्या वाङ्मयीन कार्याची दखल घेतली जाऊन 'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाशी' संलग्न होण्याचा बहुमान मिळालेली गुजरातमधील ही एकमेव संस्था आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे संमेलन ही तर साहित्यरसिकांसाठी एक पर्वणीच असते. या वर्षी हे ९१ वे संमेलन आयोजित करण्याचा बहुमान आमच्या संस्थेला मिळाला आहे. हे संमेलन बडोदे येथे १६,१७,१८ फेब्रुवारी, २०१८ असे तीन दिवस आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्षपद श्रीमंत राजमाता शुभांगिनीराजे गायकवाड या विभूषित करणार आहेत.

या संमेलनात विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा जेणेकरून त्यांना साहित्य संमेलनात आयोजित होणारे विविध परिसंवाद, कार्यशिबिरे आणि इतर साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घेता येईल. **संमेलनात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची आणि भोजनाची नि:शुल्क व्यवस्था आयोजकांकडून करण्यात येईल.**

आपणांस विनंती आहे की सदर पत्र आपल्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील प्राचार्यांना पाठविण्यात यावे. सहभाग घेण्यासाठी **प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर, प्रमुख मराठी विभाग, महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदे यांच्याशी संपर्क करावा. (09909916978) dr.ksanjaykumar@gmail.com**

सविस्तर कार्यक्रम आपणास लवकरच कळवित आहोत.

कळावे, लोभ असावा.

आपले स्वागतोत्सुक,

दिलीप खोपकर
कार्याध्यक्ष,
९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बडोदे.

19 DEC 2017
1307

**पत्ता :** "लक्ष्मी सदन", पारकर वाडा, दांडीया बाजार, बडोदे-३९० ००१. **कार्याध्यक्ष** - भ्र. : ०९७२५४१९६३८३
इ - टपाल : mvpbaroda1931@gmail.com संकेतस्थळ : www.vangmayparishadbaroda.org

संचालक
बडोदे, ०६/१२/२०१७